सकाळ, Today पुणे ६ डिसेंबर २०१० पृ.क्रं.३

# 'आयुका'तील सभागृहात उद्या खगोलशास्त्रविषयक व्याख्यान

**पुणे, ता. ५ :** ॲरिझोना विद्यापीठातील खगोलशास्त्राचे प्राध्यापक डॉ. रोमील दवे यांच्या व्याख्यानाचे आयोजन आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र व खगोल-भौतिकी केंद्रातर्फे (आयुका) करण्यात आले आहे.

विद्यापीठातील आयुका येथील चंद्रशेखर सभागृहात मंगळवारी (७ डिसेंबर) संध्याकाळी साडेसहा वाजता हे व्याख्यान होणार आहे. सुपरकॉम्प्युटर, टेलिस्कोप व इतर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने उलगडत गेलेल्या विश्वाच्या रहस्यावर डॉ. दवे आपली मते व्यक्त करणार आहेत. तसेच विश्वाबद्दल आतापर्यंत लागलेले शोध, खगोलशास्त्राच्या तंत्रज्ञानात झालेली प्रगती यावर देखील ते बोलणार आहेत.